# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक -१३/०८/२०२२

**महाळुगे पोलीस चौकी कारवाई**

**एम आय डी सी परिसरात मोटार सायकल चोरी करणा-या सराईत गुन्हेगाराला महाळुंगे पोलीसांनी ठोकल्या बेडया**

--------------------------------------------ooooo--------------------------------------------

पिंपरी चिंचवड परिसरातील मोटार सायकल चोरी वर आळा घालण्याकरिता गुन्हयांचे क्राईम मॅपिंग करुन, नाकाबंदी व पेट्रोलिंग करुन गुन्हेगारांना अटक करण्याचे आदेश मा.पोलीस आयुक्त, श्री अंकुश शिंदे सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी दिल्यानुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक, ज्ञानेश्वर साबळे, महाळुंगे पोलीस चौकी यांनी गुन्हे तपास पथक, महाळुंगे पोलीस चौकी यांना मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत व क्राईम मॅपिंग करुन पेट्रोलिंग व सी सी टि व्ही पाहुन मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघड करण्याचे आदेशित केले.

त्यानुसार वरीष्ठ पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर साबळे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील अंमलदारांनी वारंवार चोरी होणा-या ठिकाणांना भेटी देवुन मोटार सायकल चोरी गुन्हे घडले तारीख, वेळ, ठिकाण पडताळणी करुन गुन्हयांची काईम मॅपिंग तयार करण्यात आले त्यानुसार विविध ठिकाणाचे सी सी टि व्ही फुटेजची पाहणी व पेट्रोलिंग आयोजित करण्यास सुरुवात केली. .

दिनांक ११/०८/२०२२ रोजी दत्तात्रय जाधव, पोलीस उप निरीक्षक, पो.हवा.ब.नं. १४१३ बिराजदार, पो.ना.ब.नं. २४७१ वडेकर,पो.ना.काळे १८४०, पो.शि.ब.नं. २८९८ गायकवाड, पो.शि.ब.नं. २४३५ माटे महाळुंगे पोलीस चौकी असे मोटार सायकल चोरीच्या अनुशंगाने सी सी टि व्हि फुटेज व गुप्त बातमीदाराच्या आधारे इसम नामे **महेश भगवान गिरी वय २२ वर्षे रा.मेदनकरवाडी ता.खेड जि. पुणे** यास ताब्यात घेतले असता त्याने मोटार सायकल चोरले असल्याची कबुली दिल्याने त्यास चाकण पोलीस स्टेशन अंकीत महाळुंगे पोलीस चौकी गु.र.नं. १२७७/२०२२ भा.द.वि. कलम ३७९ गुन्हयामध्ये अटक करुन मा. न्यायालयाने पोलीस कस्टडी मंजुर केल्यावर घेवुन अधिक तपास केला असता त्यांनी अजुन चार मोटार सायकली चोरल्या असल्याचे सांगितले. नमुद आरोपी यांनी चोरलेल्या मोटार सायकली जप्त केल्या त्या खालीलप्रमाणे

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.नं. व कलम | चोरीस गेलेला माल | किंमत |
|---|---|---|---|---|
| ०१ | महाळुंगे पोलीस चौकी | १२७७/२०२२ भादवि क ३७९ | एम एच १४ डी यु २५०५ | १२,०००/- |
| ०२ | महाळुंगे पोलीस चौकी | १२४७/२०२२ भादवि क ३७९ | एम एच १४ बी क्यु ३२०५ | २५,०००/- |
| ०३ | महाळुंगे पोलीस चौकी | ११५९/२०२२ भादवि क.३७९ | एम.एच.१४ एफ.झेड.१३४४ | २०,०००/- |
| ०४ | भोसरी एमआयडीसी पोलीस स्टेशन | ३२६/२०२२ भादवि क.३७९ | एम एच १४ एच एन ३१३५ | ५,०००/- |
| ०५ | माहिती उपलब्ध नाही | | एम एच १२ ए के ६४८९ | ३५,०००/- |
| **एकुण ५ मोटार सायकली जप्त किंमत - १,१७,०००/- रुपये** | | | | |

## ➢ मोटार सायकल चोरी करणारे अटक केले पुरुष आरोपीची नावे : –

महेश भगवान गिरी वय २० वर्षे रा. मेदनकरवाडी चाकण ता.खेड जि.पुणे मुळ रा.भोपनी ता.देवणी जि.लातुर

## ➢ कंपनीतील कामगारांना आवाहन : –

याद्वारे एमआयडीसी मधील कंपन्यामधील कामगारांना आवाहन करण्यात येते की, कामगारांनी आपल्या मोटार सायकली कंपनीच्या आवारात कंपाऊंडच्या आत योग्य सिक्युरिटी / सीसीटीव्ही निगराणी खाली पार्क कराव्यात तसेच मोटार सायकलीला मेटल टायर लॉक लावावे व हॅन्डल लॉक करुन पार्क कराव्यात जेणेकरुन कंपनी आवारामधुन होणा-या चोरीस प्रतिबंध निर्माण होईल.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.अंकुश शिंदे,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे,** मा.पोलीस उप-आयुक्त **श्री.मंचक इप्पर,** सहाय्यक पोलीस आयुक्त **श्रीमती .प्रेरणा कट्टे** यांचे सुचना व मार्गदर्शना खाली **वरीष्ठ पोलीस निरीक्षक** श्री.ज्ञानेश्वर साबळे**, पोलीस निरीक्षक(गुन्हे)** श्री.किशोर पाटील, **पोलीस उपनिरीक्षक** दिनेश चव्हाण, **पोलीस उपनिरीक्षक** दत्तात्रय जाधव, **सपोफौ** पानसरे, **पोहवा** राजु कोणकेरी, जयवंत शिकारे, युवराज बिराजदार, **पोना** विठठल वडेकर, किशोर सांगळे, संतोष काळे, आनिल महाजन, संतोष होळकर, **पोकॉ/** शिवाजी लोखंडे, बाळकृष्ण पाटोळे, गणेश गायकवाड, अमोल माटे, संतोष वायकर, राजेंद्र खेडकर, राहुल मिसाळ महाळुंगे पोलीस चौकी यांनी केली आहे. पुढील तपास पो.हवा.ब.नं. १०३० शिकारे, महाळुंगे पोलीस चौकी हे करीत आहेत.

( मंचक इप्पर )
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड